## नियमित दिवाणी दावा क्रमांक ५४१/२०२४ मधील नि.क्र.४८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र. १ व ३ ते ७ यांनी त्यांना कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिला आहे. प्रतिवादी यांचे म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्यावर दाव्याच्या समन्सची बजावणी झाल्यानंतर दाव्याकामी हजर होऊन निशाणी ५ च्या अर्जावर म्हणणे दाखल केले व कैफियत देणेस मुदत मागितली होती. प्रतिवादी ३ व ५ ते ७ या सासरी नांदत असल्यामुळे मुलांच्या व संसाराच्या व्यापातून त्यांना कैफियत मुदतीत देता आली नाही. प्रतिवादी क्र. १, ३व ५ ते ७ यांनी प्रतिवादी क्र. ४ च्या लाभात कुलमुखत्यारपत्र करुन दिले होते व आहे. परंतु, प्रतिवादी क्र. ४ हे वयोवृध्द असून आजारी असल्यामुळे डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला होता. तसेच, प्रतिवादी क्र. ४ यांना दावा मिळकतीची महत्त्वाची कागदपत्रे हे वेळेत उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफियत सुनावणीचा आदेश झाला आहे. न्यायिक दृष्टया प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर येणे महत्त्वाचे आहे. प्रतिवादी यांना दाव्यात कैफियत दाखल करणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

२. वादी यांनी सदर अर्जास हरकत घेतली. वादीचे म्हणण्यानुसार, अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. अर्जातील कारण कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. अर्जदाराचे कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी मागणी प्रमाणे परवानगी मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### का र ण मी मां सा

४. वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा दिनांक ०३.१०.१९८९ रोजीचे व दिनांक ०४.१०.२००७ रोजीची खरेदीखते बंधनकारक नसल्याचे व मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी यांना समन्स् व नोटीस बजावणी झालेली आहे. परंतु, त्यांनी हजर होऊन वेळेत कैफियत दिलेली नाही. प्रतिवादीस कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात आला आहे. प्रकरणातील वाद निराकरणसाठी प्रतिवादी कैफियत अभिलेखावर असणे आहे. सबब मुद्दा नं.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा नं.२ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

### आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरुध्द विना कैफियत आदेश पारित करण्यात आलेला नाही, त्यामुळे त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येते.

VAIBHAV BAJRANG GHADAGE
Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.04 17:38:46 +0530

वडूज.
दिनांकः- ०३.१०.२०२५

( व्ही. बी. घाडगे )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.